# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १९२ वा ❑ बुधवार दि.१७ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## विलास झट्टे : गावाकडचा साधा माणूस


– प्रा डॉ सुधीर अग्रवाल


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सोशल मीडियावर रील्स म्हणजे छोटे व्हिडिओ असतात, जे मनोरंजन, माहिती आणि लोकांशी जोडले जाण्याचे एक माध्यम बनले आहेत. हे छोटे व्हिडिओ लोकांना इंस्टाग्राम आणि फेसबुक सारख्या प्लॅटफॉर्मवर लोकप्रिय बनवतात, ज्यामुळे वापरकर्ते विविध प्रकारची सामग्री तयार करून शेअर करू शकतात आणि इतरांशी संवाद साधू शकतात. सोशल मीडियावरील अनेक रील्स व व्हिडिओ मनोरंजनात्मक असले तरी काही व्हिडिओ वास्तव जीवनावर आधारित असतात.अनेक रील्स सामाजिक,आर्थिक,गरिबी,

बेकारी,ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनाला भेडसावणारे प्रश्न,वाढती महागाई असे ज्वलंत प्रश्न

रील्सच्या माध्यमातून मांडण्याचा काहींचा हेतू असतो . नेटकऱ्यांचा हेतू असतो.काहीसा असाच प्रयत्न सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्रामीण जीवांचे वास्तव व ज्वलंत प्रश्न जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न विलास झट्टे करत आहे.गावाकडचा साधा माणूस हे विलास झट्टे यांच्या रील्सचे शिर्षक.

विलास झट्टे गावाकडचासाधा माणूस, या नावाने प्रसिद्ध असलेला यवतमाळ जिल्ह्यातील रिल्स मास्टर आपल्या भन्नाट कल्पनाशक्तीतून समाज प्रबोधनासोबतच मनोरंजन करत आहे. सोबतच समाजातील अनिष्ट प्रथा परंपरा शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शैक्षणिक धोरणावर रिल्स बनवून समाज व सरकारला जागृत करत आहे.

विलास झट्टे हे एक ग्रामीण जीवन जगणाऱ्या एका सध्या गरीब,शेतकरी शेत मजुरांच्या समस्याचे चित्र आपल्या रील्सच्या माध्यमातून मांडत आहे.

ग्रामीण भागात गरिबी व मूलभूत गरजांची कमतरता, बेरोजगारी, अपुऱ्या पायाभूत सुविधा (पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण), कमी शेती उत्पन्न आणि दुष्काळासारख्या समस्यांमुळे त्रस्त आहेत.की ज्यामुळे आर्थिक आणि सामाजिक असुरक्षितता त्यांच्या जीवनात कशी निर्माण होते याचे जिवंत चित्रण विलास झट्टे आपल्या रीलसच्या माध्यमातून करत असून गरिबीमुळे व्यक्ती आणि घरांवर गंभीर परिणाम कसा होतो याचे चित्रण असंख्य नेटकऱ्यां समोरच मांडत आहे.या चित्रणामुळे ग्रामीण जीवनाचे वास्तव सरकार व प्रशासनाला कळण्यास मदत होत आहे.

या वर्षी पावसाने खूप धुमाकूळ घातला असून अनेक शेतकऱ्यांचे पिक वाहून गेले. गेल्या काही दिवसात महाराष्ट्रातही मान्सूनपूर्व पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे भरपूर नुकसान झाल्याचे सामोरे आले आहे.सध्या देशाच्या विविध भागात अधूनमधून पाऊस पडत आहे. महाराष्ट्र आणि इतर राज्यात शेतात पाणी साचल्यामुळे कांदा आणि इतर बागायती पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी ई पीकपाणी करावी,अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

ई–पीक पाहणी ही शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातील पिकांची माहिती डिजिटल स्वरूपात, छायाचित्रांसहित, थेट शासनाच्या डिजिटल डेटाबेसमध्ये नोंदवण्याची प्रक्रिया आहे. डीसीएस या मोबाईल ॲपद्वारे शेतकरी आता स्वतः ही नोंदणी करू शकतात, ज्यामुळे पिकांची माहिती सरकारकडे जमा होते व तिचा उपयोग पीक विमा, अनुदान व इतर शेतीविषयक योजनांसाठी होतो. मात्र गरीब शेतकऱ्यांना जिथे जीवनावश्यक गरजा भागवायला , पैसे नाही असे शेतकरी टच स्क्रीन वाला मोबाईल घेणार का? एकटी पाणी करताना शेतकऱ्यांसमोर अनेक अडचणी येतात एक तर शेतकऱ्यांजवळ टच स्क्रीन वाला मोबाइल नाही दुसरी गोष्ट ग्रामीण भागात नेटवर्कचा प्रॉब्लेम असतो. मोबाईल घ्यायला पैसे नाही.

नोंदणी करताना काही अडचण आल्यास, तुम्ही तुमच्या नजीकच्या कृषी विभागाच्या कार्यालयात संपर्क करू शकता कृषी विभागाला अडचणी सांगल्यास ते दुर्लक्ष करतात.

याचे वास्तव चित्र विलास झट्टे आपल्या चित्रणातून मांडत शेतकऱ्यांची व्यथा समाज , प्रशासना समोर मांडतात.त्यांचे अनेक व्हिडिओ मनाला स्पर्श करून जातात.

विलास झट्टे यांचे अनेक व्हिडिओ सोशल लोकांना विचार करायला लावतात, कारण ते माहिती, प्रेरणा, कौशल्ये आणि विविध दृष्टिकोन देतात, ज्यामुळे नवीन गोष्टी शिकायला आणि स्वतःला व्यक्त करायला मिळते. हे व्हिडिओ माहितीपूर्ण असू असतात.काही रील्स मनोरंजन देखील करतात. दोन्ही प्रकारे ते प्रेक्षकांना विचार करण्यास प्रवृत्त करतात.

विलास झट्टे यांचा ई पीक पाहणी रील्स खूप व्हायरल होत आहे.शेतकऱ्यांचे होणारे हाल या व्हिडिओतून त्यांनी शेतातील चित्रण दाखवले आहे. सध्या महाराष्ट्रात सर्वत्र जोरदार पाऊस येत आहे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून ई पीक ॲप मधून पिकांची रियल स्थिती दर्शविणारे फोटो त्या ॲप मध्ये अपलोड करायचे आहे. मात्र ई पीकॲप मध्ये लोकेशन दाखवत शेताचे न दाखवता शेतीतून २० किमी दूरचे लोकेशन दाखवत असल्याने शेतातील नापीक व्हिडिओ त्यात होत नसल्याची व्यथा त्यांनी मांडली आहे. त्यांचे मित्र एक पाहण्याची तक्रार कृषी अधिकाऱ्यांकडे करायला सांगतो.तेव्हा त्यांनी शेतात झालेल्या नुकसान भरपाई ची तक्रार पटवारी कृषी अधिकारी तहसीलदार व एसडीओकडे केल्याचे त्यांनी व्यथा मांडली आहे.

असे अनेक व्हिडिओ व रील्स त्यांनी जनसामान्यांच्या व गावातील शेतकऱ्यांचे प्रश्न मांडत आहेत.

# मुलांना मातृभाषेतून शिकवायला हवे – चिन्मयी सुमीत

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

ठाणे : माझ्या मुलांना मी नैसर्गिकरित्या मराठी माध्यमात शिकवले, पण त्यासाठी एक अभिनेत्री असण्यापेक्षा माझ्या या भूमिकेचे आधिक कौतुक होते. माझे सत्कार केले जात आहेत. मी जिथे जाते तिथे एखाद्या प्राणीसंग्रहालयात गेल्यावर जसे प्राणी बघायला लोक येतात. तसे लोक माझ्याकडे पाहतात. मुलांना मराठी माध्यमांच्या शाळेत घातले म्हणून माझे होणारे सत्कार हे आपल्या मराठी भाषेचे दुर्दैव असल्याची खंत अभिनेत्री चिन्मयी सुमीत यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या वतीने महिला साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्या संमेलनात 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि वर्तमानकालीन आव्हाने' या विषयावर टॉक शो मध्ये त्या बोलत होत्या. या शो मध्ये ज्येष्ठ पत्रकार राही भिडे ज्येष्ठ लेखिका, इंदुमती जोंधळे, शहा या सहभागी झाल्या होत्या. शिल्पा कांबळे यांनी या शो चे संचलन केले.



आपण आपल्या भाषा आणि स्वातंत्र्याला गृहित धरले आहे, असे मत व्यक्त करून चिन्मयी म्हणाल्या, आपल्या भाषेवर अनेक आक्रमणे झाली तरीही मराठी भाषा टिकली आणि यापुढेही भाषा टिकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपले मन, विचार आणि भावना व्यक्त करण्यासाठी मातृभाषाच हवी, त्यासाठी मुलांना मातृभाषेतून शिकवायला हवे, पण मातृभाषेत मुले शिकली नाहीतर ती स्मार्ट होणार नाहीत, अशी भीती पालकांना वाटते, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

व्यक्त होणं हा प्रत्येकाचा धर्म आहे, पण आता व्यक्त व्हायला भीती वाटेल, अशी सद्यस्थिती असल्याचे भाष्य लेखिका इंदुमती जोंधळे यांनी व्यक्त केले. पारलिंगी समुदायास व्यक्त होण्यासाठी शब्द नाहीत, याकडे शहा यांनी लक्ष वेधले. राही भिडे यांनी माध्यमांमध्ये आता पूर्वीइतके व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य राहिले नाही.असे मत व्यक्त केले. भारत हा महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा देश आहे, त्यामुळे भारतात नेपाळसारखी परिस्थिती उद्भवणार नाही, तर संविधानिक विचारांनी देशात क्रांती होईल, असे मत चिन्मयी सुमीत यांनी व्यक्त केले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे


आज १७ सप्टेंबर, आजचा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता. पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थांनात विलीन होता. हैदराबाद संस्थानावर निजाम उर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते. निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती. या संस्थांनात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले. दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावात लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. ते खूप धाडसी होते त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय मिळाला. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सायंकाळ पर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले. चाळीसगावहुन निघालेल्या फौजेने कन्नड,दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या. भारतीय



फौजांपुढे निजामाच्या फौजेचे काही चालले नाही.

अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणागती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले. हैदराबाद मुक्ती संग्राम यशस्वी झाला. हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला . तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो. मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा. सर्व मराठवाडा वासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

## 'नवा भारत : सांस्कृतिक महासत्ता' या विषयावरील प्रदर्शनाचे सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या हस्ते बुधवारी उद्घाटन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**मुंबई** – सांस्कृतिक कार्य विभाग आयोजित "नवा भारत : सांस्कृतिक महासत्ता" या उपक्रमाचा शुभारंभ सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते बुधवार, दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे होणार आहे.

पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वात भारत सांस्कृतिक महासत्ता म्हणून ओळखला जात आहे. "एक भारत, श्रेष्ठ भारत" या संकल्पनेतून देशातील विविधतेला एकात्मतेत रूपांतरित करताना त्यांनी भारताची सांस्कृतिक ताकद जगासमोर प्रभावीपणे उभी केली.

"नवा भारत : सांस्कृतिक महासत्ता" या उपक्रमांतर्गत भारतीय संस्कृतीचे वैभव, विविधतेतून एकता आणि परिवर्तनाचे दर्शन घडविणाऱ्या निवडक छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटनही सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या हस्ते होणार असून हे प्रदर्शन दि. २३ सप्टेंबर पर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत रसिकांसाठी खुले असेल. प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर ज्येष्ठ अभिनेते आणि आंतरराष्ट्रीय विषयांचे अभ्यासक दीपक करंजीकर यांचे "नवा भारत : सांस्कृतिक महासत्ता" या विषयावरील व्याख्यान लघुनाट्यगृह येथे आयोजित करण्यात आले असून हे व्याख्यान रसिकांना नवा विचार देणारे ठरणार आहे. त्यानंतर प्रभात फिल्म्स निर्मित ऐतिहासिक 'संत तुकाराम' चित्रपटाचे विशेष प्रदर्शन होणार आहे.

या संपूर्ण कार्यक्रमासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर रसिकांना संधी उपलब्ध होईल. तसेच हे प्रदर्शन विनामूल्य असून त्याचा लाभ जास्तीत–जास्त लोकांनी घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड .शेलार यांनी केले आहे.

# वास्तुशास्त्र पेंटिंग



### लघुलेख -४४

आपल्या प्राचीन, प्रगल्भ आणि प्रस्थापित ग्रंथांमधून वृक्षांना सन्मान देण्यासाठी अनेक व्रत-वैकल्ये केली जातात. माणूस आणि वृक्ष यांचा किती अनन्यसाधारण संबंध आहे हे यावरून समजते.

'वृक्ष वल्ली आम्हां सोयरे, वनचरें' हे संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी १६ व्या शतकात लिहून ठेवले आहे. "सोय जाणील तो सोयरा" अशी प्रचलित म्हण आहे. तुकारामांना, वृक्षवल्ली 'सोयरे' वाटतात. खरंच आहे ना त्यांचं...!! आपली म्हणजे समस्त मानवजातीची "सोय", पृथ्वीवरील समस्त वृक्षवल्लींनी केलेली आहे. बघा ना... आवळा नवमी, अर्क (रुई) सप्तमी, अशोक कालिका भक्षण, अरण्य व्दादशी, अशोकाष्टमी, अशोक पोर्णिमा,अशोक प्रतिपदा, आमलकी एकादशी, आश्वत्थव्रत, आम्रपुष्प भक्षण दिन, कदली व्रत,कमल षष्ठी, कमल सप्तमी, करवीर (कण्हेर) प्रतिपदा, कल्पवृक्ष व्रत, कुष्मांड दशमी, तांबूल संक्रांती, ताल नवमी, तिन्दुकाष्टमी, तिल चतुर्थी, दमनकारोपण, दशाफल व्रत, दुर्वाष्टमी, दुर्वा त्रिरात्र व्रत, द्राक्षोभक्षण, धात्री व्रत, धान्य सप्तक व्रत, बिल्व लक्षव्रत, मंदार षष्ठी, मंदार सप्तमी, महाफलव्रत, मघपाली, तृतीया, रम्भा तृतीया, रम्मा त्रिरात्रव्रत, वृंताक त्याग, शाक सप्तमी, सर्षपसप्तमी {संदर्भ: सूरपाल विरचित वृक्षा आयुर्वेद (डॉ. काणे)}. या व अशा आणखी ना व्रतांना, विशिष्ट वृक्ष-वल्लींना महत्व देवून, साजरे करण्याची प्रथा आहे. जेणे करून या वृक्ष-वल्लीं मध्ये आणि मानवा मध्ये एक सुप्त संवाद साधला जावा.हा उदात्त हेतु यामागे आहे हे ध्यानात येते.

आपले 'वास्तुशास्त्र पेंटींग 'हे पूर्णपणे नक्षत्रांच्या, 'आराध्य वृक्षांच्या चित्रगुणांवर आधारीत आहे म्हणूनच, जातकाने त्याच्या वास्तूत या पेंटींगचा, अंतर्गत गृह सजावटीचा एक भाग म्हणून अंतर्भाव केला तर त्या त्या आराध्य वृक्षांच्या 'पंचांग' मुळे आणि इतर आवश्यक घटकांचा अंतर्भाव केल्यामुळे ते "पेंटींग" आपल्या वास्तुचाच नव्हे तर आपल्या कुटूंबाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनते.

आपण 'वास्तुशास्त्र पेंटींग' हे वास्तु-व्यवसाय, उद्योग-कंपनी वा इंडस्ट्री साठी बनवु शकतो. आपणांस फक्त जमीन वा क्षेत्र किती व्यापलेले आहे, हे सांगणे आणि तसा तपशील देणे आवश्यक असते...!!

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

---


लेकीला मागणं
सांगा हिच्या भावाला
नको करू रे फिकर
वाट पायी जायला ॥२६१॥

लेकीला मागणं
दूध वाघणीच घरी
एका वाड्यात नांदती
दहा पिढ्या बरोबरी ॥२६२॥

---

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# आजी-आजोबा : वटवृक्षाची सावली




ज्योतिर्मय साहित्य

आचार्य अत्रेंची ( केशवकुमार ) एक कविता आहे. आजीचे घड्याळ. त्यानुसारच माझी आजी वागायची. न दिसणारे, आवाज न करणारे घड्याळ निसर्गानेच तिला बहाल केले होते. सगळ्या गोष्टी इतक्या वेळच्या वेळी असत की तिला घड्याळाची गरजच नसे. महिना, दिवस, तिथी या गोष्टी तिच्या अगदी बरोबर लक्षात असत. त्यासाठी तिला कालनिर्णय किंवा पंचांग पाहावे लागत नसे. सण, उत्सव यासारख्या दिवशी तर उत्साह काही वेगळाच असायचा. अशी ही माझी आजी. आजही माझ्या स्मृतीत जिवंत आहे. आजोबा तर मला आठवत नाहीत कारण ते खूप पूर्वीच वारले होते. पण त्यांच्या पश्चात आजीने सगळ्या संसाराचा डोलारा सांभाळला, मुलांना घडवले, मोठे केले. अशा या आजीचा सहवास काही वर्षे का होईना पण मला लाभला हे माझे केवढे भाग्य !




"घरात आजी-आजोबा असतील तर ते घर जिवंत असतं" हे वाक्य आपण अनेकदा ऐकतो आणि ते अगदी खरं आहे. ते घराच्या असतात कडेला असलेल्या वटवृक्षासारखे सावली देणारे, आसरा देणारे आणि घराला मुळांशी जोडून ठेवणारे. आजी आजोबा असतील तर घर कसं भरलेलं वाटतं !

आजी-आजोबांचं आणि नातवंडांचं नातं विलक्षण असतं. आईवडिलांच्या शिस्तीमधून मुलं "कसं करावं" शिकतात, तर आजी-आजोबांच्या मांडीवर बसून "का करावं" हे शिकतात. आजीच्या गोष्टींमध्ये संस्कारांचा गोडवा असतो, तर आजोबांच्या अनुभवांतून जगण्याचं शहाणपण.

लहानपणीच्या आठवणी आठवल्या की मन ओलावतं आजीने सांगितलेल्या गोष्टी, प्रत्येक गोष्टीच्या शेवटी मिळणारा संस्कारांचा अनमोल धडा. सकाळी उठल्यावर कराग्रे वसते लक्ष्मी ... हा तिने शिकवलेला श्लोक आजही आठवतो. आजी आजोबांसाठी नातवंडं म्हणजे दुधावरची साय मऊ, गोड, डोळ्याचं पारणं फेडणारी. त्यांच्या दुडदुडू चालण्यातून, पहिल्यांदा उच्चारलेल्या शब्दांतून, छोट्या हसण्यातून आजी-आजोबांना जणू टॉनिक मिळतं. जीवन जगण्याचा उत्साह मिळतो. आणि नातवंडांना मिळतो मायेचा ओलावा, प्रेमाचा उबदार स्पर्श, थरथरत्या हातांची प्रेमळ मिठी !

परंतु आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत हे नातं विरळ होत चाललंय. घरं मोठी आहेत पण अनेक घरात आजी-आजोबांची खोली रिकामी दिसते. घरं रीती आणि वृद्धाश्रम फुललेले ! खरं तर त्यांची जागा घराच्या मध्यवर्ती असावी त्यांच्या पावलांनी घर जिवंत होतं, त्यांच्या नजरेतून पिढ्या शिकतात, त्यांच्या आशीर्वादाने भविष्य उजळतं.

(क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# बद्धलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

जसा अंध माणूस अंधारात चाचपडतो. तसा बद्ध माणूस अज्ञानाच्या अंधारात जगतो.आंधळाल्या ड़ोळे नसल्याने चारी दिशा शुन्य वाटतात, तशीच बद्धाची अशस्था असते. ज्ञानाचा अभाव असल्याने परमात्मा आतबाहेर असून बद्धाला तो असुन नसल्यासारखा वाटतो. भक्त, ज्ञानी, तपस्वी, योगी,विरक्त, सन्यासी हे समोर असुनही त्याला ते दिसत नाहीत. किंवा अशा लोकांची योग्यता त्याला कळत नाही.


२)चांगलेकर्म, वाईटकर्म, धर्म, अधर्म हे तो पहात नाही किंवा समजून धेत नाही. साधासोपा, परमार्थ मार्ग पहात नाही समजावून घेत नाही.

३) खरे शास्त्र कोणते, सत्संगात कसे रहावे,चांगले वाईट कोणते पहात नाही. त्यांचा विचार करत नाही. सारासार विवेकबुद्धी, स्वधर्माबद्दल आदर, परोपकार, ज्ञान व दान, पुण्य हे काहीही कलत नाही किंवा त्याविषयी वैचारिक बैठक तयार नसते.

बद्धलक्षणाच्या माणसाला भूतदया नसते, देहाची स्वच्छ ता नसते. अत:करण शुध्द नसते. मवाळवाणी नसते. भक्ति, मुक्ति, वैराग्य, साधनध्यान मोक्ष साधन या विषयावर तो काही बोलत नाही. किबहूना त्याच्याकडे तो बघत नाही. समाजातील असे अनेक लोक आहेत की ते फक्त आणि फक्त स्वतः चा विचार करतात. आपल्या स्वभावाने, आपल्या बोलण्याने समोरचा दुखावला जातो हट्टी, दुराग्रही लोक समाजात जागोजागी आढळतात. त्यातून आजकालच्या सामाजिक परिस्थिती चा विचार केला तर भोगवादी विचारसरणी वाढली आहे. नको नको वाटेल अशी प्रसिद्धी माध्यमे वाईट विचारांना प्रोत्साहन देत आहेत. संतसहवास,आदर्श विचार चिंतनशील स्वभाव, खरे ते खोटे व खोट्या गोष्टींना प्रतिष्ठा मिळत आहे. हे सर्व बद्धलक्षण आहे

(क्रमशः)

# सर्वस्वी राहावे रामास अर्पण ।



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आता ऐका माझे वचन । मनाने व्हावे रामार्पण ।। माझे नातेगोते एक राम । हा भाव ठेवून जावे रामास शरण ।। अनन्य व्हावे भगवंती । जो कृपेची साक्षात् मूर्ति ।। रामा आता करणे नाही उरले जाण । तुला आलो मी अनन्य शरण ।। सुखदु:खाचा दाता । सत्य नाही दुजा आता ।। जाणिवेने जैसे घ्यावे । तैसे मनाने सुखदु:ख भोगावे ।। मी-माझेपणाची जोपर्यंत धडपड जाण । तोपर्यंत नाही समाधान ।। सर्वस्वी राहावे रामास अर्पण । हाच उपाय सांगती साधुजन ।। रामाला अर्पण व्हावे कोण्या रीती । त्याचा मार्ग सज्जन सांगती ।। प्रयत्नेविण राहो नये । फळाची आशा ठेवू नये । भगवंताला विसरू नये । कर्तव्य या दृष्टीने कर्म करावे ।। प्रथम राखावे भगवंताचे अधिष्ठान । तेथे व्हावा प्रयत्नाचा उगम ।। अखंड राखावे अनुसंधान । येणे कर्म होईल सहज रामार्पण ।।

वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेच संताचे मुख्य लक्षण जाण ।। जे जे घडेल काही । ते ते रामइच्छेने पाही।। असा करावा संसार । परि असावे खबरदार । त्राता राम जाणुनी चित्ती । निर्भय करावी आपली वृत्ति। थोर भाग्य उदया आले । रामराय घरी आले । आता व्हावे रामाचे आपण। व्यवहार प्रपंच करावा जतन ।। न दुज्याचा दोष पाहावा । त्याचा आपणापाशीच ठेवा ।। देह आहे परतंत्र । मन राखावे भगवंताशी स्वतंत्र ।। मनाने जो बांधला । परतंत्र वाटेल त्याला ।। शरण गेला रामचरणी । त्याला नाही दुजी हानि ।। अखंड करावे नामस्मरण । नीतिधर्माचे असावे आचरण ।। बायकोमुले, लहान थोर । यांनी न सोडावा रघुवीर ।। काळ फार कठीण आला । बुद्धिभेद त्वरित झाला ।। आता सांभाळावे सर्वांनी आपण । रामाविण न जाऊ द्यावा क्षण । चालले तसेच चालावे। राम ठेवील तसे असावे ।। माझा राम जोडला हे जाणले ज्याने । त्याला न उरले करणे।। राम ठेवील ज्या स्थितीत । त्यात समाधान मानावे ।। रामास जे करणे असेल । ते तो करील ।। सदा सर्वकाळ माझ्याशी वास । हाच धरावा हव्यास ।। त्याला न जावे लागे कोठे । घरबसल्या राम भेटे ।। जो करी रामपदांबुजचिंतन । तयास नाही यमाचे बंधन ।। संताची सेवा केली । महद्भाग्य घरी आले।। एका परमात्म्याशिवाय नाही कोणास शरण ।। तोच खरा धन्य धन्य ।। संताचे मर्जीने वागल्यास। कल्याण होईल खास ।।

अखंड राखावे अनुसंधान । येणे कर्म होईल सहज रामार्पण ।।

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# पाप,पुण्य टाळता येते का?

ज्योतिर्मय साहित्य

ऐसा ब्रम्हानुभवी जो देख /कर्म तेच होय रंक/
वेद तपाचे सेवक/ विधी विवेक कामारी//
संकल्पु नाही वृत्ती/ हेतू स्फुरेणा चित्ती /
ऐसी कर्मे ज्ञाते करिती/ शरीर स्थिती केवळ//
तेथ सत्कर्म सिद्धी गेले तेणे फुगे ना म्या हे केले/
अथवा माघारी विकल पडले/
तेणे तगमगिले पण नाही//

आत्म ज्ञाना नंतर साधकाचा सिद्ध होतो. या अवस्थेत देह क्रिया म्हणून कर्म घडतात पण त्यावेळेस त्या साधकाच्या मनात किंचितही कर्मे मी केली, मी करीत आहे, किंवा मी करीन असा संकल्प जरा सुद्धा नसतो. हे कर्म यशस्वी झाले तरी त्याचा मोठेपणा ज्ञानी पुरुषास जाणवत नाही. तसेच असे कर्म अपूर्ण किंवा अयशस्वी झाले तरी त्याचेही रुखरुख मनात उमटत नाही. म्हणून अशी कर्मे घडली तरी अशा सिद्ध पुरुषास त्याची बाधा उरत नाही.

केवळ शरीर कर्मे होती/
तीच अहेतूक बोलिजेती/
अर्भक दृष्टांत ते उपपत्ती/
हे ची स्थिती सांगितली//

आत्म ज्ञान प्राप्ती झाली म्हणजे कर्म हेतूक पणे कशी होतात ? आणि हातून घडलेल्या कर्माचे बंधन सिद्ध पुरुषास बाधत नाही. हे वज्र कवच त्यास कसे लाभते ते आपण पाहिले.

पण आपल्यासारख्या सामान्य जनांचे काय?

आपण प्रकृतीच्या अधीन असणारी, सर्वसामान्य माणसे आहोत. आपणास निषिद्ध कर्म आपण केले नाही तरी इतर कर्मा द्वारे कर्म बंधनातून सुटण्याचा काही मार्ग आहे काय? याचाही विचार आपण आता करणार आहोत. आपले प्राण मन व बुद्धी ही कायम विषयाकडे वळलेली असते. अशावेळी श्वासा गणिक घडणारी असंख्य कर्मे आपणास भोगावीच लागतात कुठल्या आणि कुठल्या जन्मात अगदी बिनचूकपणे या कर्माचा झाडा द्यावाच लागतो. यातून कसे सुटावे यासाठी आपल्या संत महंतांनी एक सुंदर उपाय आपणास सुचविला आहे. आणि तो त्यांच्या सिद्ध अवस्थेपर्यंत जाण्याच्या प्रवासात त्यांनी तो काटेकोरपणे अंमलात देखील आणला आहे. या दिव्य प्रयोगाचे नाव आहे परवानगी व अर्पण आपण जीवनात प्रत्येक कर्म करताना, अगदी घरातील कामे करताना सुद्धा, ती आपणासाठी करीत आहोत किंवा आपल्या जिवलग, पती-पत्नी मुले बाळे यांच्या हितासाठी करीत आहोत या भावाने करतो. आणि हेच कर्म बंधनात टाकणारे आहे. ही कर्मे तर करावीच लागतात . प्रपंचात राहून आपणास पती म्हणून, पत्नी म्हणून, मुलगा म्हणून, आई बाप म्हणून आपल्या आपल्या भूमिका वठवाव्याच लागतील. त्या सोडूनही चालणार नाही.

मग हा प्रयोग करणार कसा?

तर मी प्रभुच्या साठी सर्व कर्मे करणार आहे. माझा मुलगा, मुलगी ,पती-पत्नी आई-वडील नातेवाईक ही सर्व प्रभूचीच रूपे आहेत. प्रभू यांच्याद्वारे माझ्याकडून सेवा करून घेणार आहे. हा भाव जर ठेवला ,आणि प्रत्येक कार्य करताना प्रभुची परवानगी मागितली तर फरक पडेल.

जसा एखादा नोकर मालकास विचारून कार्य करतो. मालकाने त्यास खड्डा खण असे सांगितले आणि याने तो खड्डा खणला आणि त्या खड्ड्यात पडून कोणाचा अपघात झाला तरी दोष नोकरा कडे येत नाही. याचे कारण नोकराने मालकाच्या आज्ञेनुसार, इच्छेनुसार कार्य केले होते. पण हेच जर त्या नोकराने मालकाची परवानगी न घेता तेच कार्य केले व अपघात झाला तर दोष मालक स्वतःकडे घेत नाही. अगदी याच नियमानुसार आपण व्यवहारातील सर्व कामे मनोमन प्रभू हा आपला मालक आहे त्याच्या इच्छे करिता त्याच्या परवानगीने त्याचेच कार्य करणार आहोत हा भाव ठेवून कार्य करायचे .ते कार्य पूर्ण झाले की त्याचे फळही आपण स्वतः घेणे अयोग्य ठरेल. **(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**अथ श्रीदेवीपञ्चकम्।**

**भक्ताय रेणुकायाश्च सर्वं सहजमेव वै।**
सुखं भवतु वा दुःखं तितीक्षा तस्य जीवति।।४९।।

रेणुकेच्या भक्तासाठी सर्व सहजच आहे. सुख असो वा दुःख त्याची सहनशक्ती जीवित असते.

**शक्तिरेव तितीक्षाऽपि शाक्तस्य भूषणं खलु।**
**दया क्षमा तथा शान्तिः शूरस्यैव विराजते।।५०।।**

तितीक्षा ही सुध्दा शक्तीच आहे. ती शाक्ताचे भूषण आहे. शूरालाच दया, क्षमा आणि शांती शोभून दिसते.

**रक्षणं च विकासश्च ज्ञानं च कृपया तथा।**
**सिंहे च कमले हंसे दुर्गा लक्ष्मी सरस्वती।।५१।।**

सिंहावरील दुर्गा आपल्या कृपेने रक्षा करते. कमलावरील लक्ष्मी आपल्या कृपेने विकास घडवते. हंसवाहिनी सरस्वती आपल्या कृपेने ज्ञान देते.

**नत्वा स्तुत्वा रूपाणि व्यापनीयं हि जीवनम्।**
**तस्मादेव हि शक्यते सुखं देव्याः प्रसादतः।।५२।।**

त्या रूपांना नमन करून, त्यांची स्तुती करून जीवन व्यतीत करावे. असे केल्याने देवीप्रसादामुळे सुख प्राप्ती शक्य होते.





# द्विदल धान्यांची ओळख

ज्योतिर्मय साहित्य

द्विदल म्हणजे ज्यापासून डाळी तयार केल्या जातात ती धान्ये. या कडधान्यांचा आपण सर्रास वापर कुठल्या ना कुठल्या स्वरूपात मोठ्या प्रमाणावर करीत असतो.

ही धान्ये सर्वसाधारणपणे मधुर तुरट रसाची, कोरडी, वात वाढवणारी, कफपित्तनाशक, मलावष्टंभ करणारी असतात त्यामुळेच भाजीला पर्याय म्हणून रोज कडधान्याची उसळ आहारात योग्य नाही. आठवड्यातून तीन दिवस चालू शकेल.

सर्व धान्यांमध्ये मूग श्रेष्ठ. किंचीत वातूळ आहेत, पण पचायला हलके, कफपित्तनाशक. हिरव्या रंगाचेच मूग उत्तम. मूग शिजवून त्यावरील पाण्यात सैंधव, हिंग, मिरी, पिंपळी, सुंठ घालून जीऱ्यासह तूपाची फोडणी दिली की, मूगाचे कळण किंवा यूष तयार होते. हा यूष अग्निवर्धक, जीभेला चव आणणारा, पाचक, ताकद देणारा असल्याने आजारपणात व नंतरच्या अशक्तपणात उत्तम.

यानंतरचे मूगाखालोखाल वापरण्यास चांगले धान्य म्हणजे मसूर. पचायला हलकी, पौष्टीक, कफ /पित्त /रक्तविकारात उपयुक्त आहे. आहारात त्यामानाने जास्त वापरायला हरकत नाही.

मटकी मधुर रसाची, मलाला बांधिवत्व देणारी, रूक्ष आणि थंड. उष्णताजन्य आजारात पथ्यकर. याचेही कळण करता येते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

कुळीथ उष्ण, रक्त व पित्त दोष वाढविणारा, कफवातनाशक, मुतखडा घालविणारा, सर्दीनाशक, श्वासनाशक, क्रुमीनाशक आहे. उन्हाळ्यात आणि पित्तप्रकृतीच्या लोकांनी जपून वापरावा. कुळीथाचे कळण आमदोष घालविण्यास उत्तम.

वाटाणा गोड, कोरडेपणा आणणारा, फारच वातूड आणि थंड. कच्च्या मटारांनी द्रवमल प्रवृत्ती होते.

चवळी वातुड, कोरडी, पचायला जड, जास्त मल निर्माण करणारी आहे.

पावटा जड, सारक, वातुड, रक्त स्तन्य व मूत्र यांची निर्मिती करणारा आहे.

चणा थंड, कोरडेपणा उत्पन्न करणारा, मलावष्टंभक आणि वातकारक आहे. परंतु कफपित्तजन्य विकार व ज्वर नाशक असल्याने याचे सूप अशा विकारात उपयोगी ठरते. भिजवून भाजलेले चणे चव उत्पन्न करणारे (रुचकर) आणि ताकद देणारे आहेत.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

सीतेला हनुमानाचे शुरत्व पटले होते. त्यांनी बळाने वृक्ष उचलून फेकले होते. लंका जाळली, राक्षसांना मारले होते. रावणाचा पुत्र मारला. पण प्रभु त्यांच्या सेनेसह हा एवढा मोठा समुद्र कसा ओलांडून येतील? याचीच चिंता त्यांचे मनात घर करून राहीली होती.

गीतेत धृतराष्ट्राच्या मनात संशय निर्माण झाला नाही, तसा तो संजयच्या मनात देखील झाला नव्हता. कारण धृतराष्ट्राला कांहीच माहीत नव्हते तसे संजयला सर्व माहिती होते. त्यामुळे संजयचे शंकेचे निरसन होणे गरजेचे होते. वर्गात अतिशय हुशार व ढ अशा दोन्ही विद्यार्थ्यांना कोणतीच शंका येत नाही.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

हनुमान सितेस म्हणाले, रामांच्या कृपेने मी जर हा पराक्रम करू शकतो तर प्रत्यक्ष राम हे का नाही करू शकणार?

हनुमंताने सीता माता सापडल्या ही आनंद वार्ता वानरांना सांगितली. हे ऐकून सर्व वानरानी एकच जल्लोष केला. त्यांनी आनंदात सुग्रीवाचे उपवनात धिंगाणा घालून ते उध्वस्त केले.

राम म्हणतात, सीतेचा शोध लागला पण ती समुद्राच्या पलीकडे आहे. हा समुद्र कसा ओलांडायचा? ही चिंता करू लागले. सुग्रीवाने आपण कांहीं करू शकतो, हनुमान ही आहे. आपण कांहीं मार्ग काढू असे सांगितले.

तिकडे रावण चींताक्रांत आहे. ज्याचा केवळ सेवक इतका विध्वंस करू शकतो तो स्वतः आला तर तो काय करू शकतो?

(क्रमशः)

# कर्तव्य बुद्धीने केलेले दान सामाजिक उन्नतीस वरदान डॉ. स्वाती शिरडकर यांचे प्रतिपादन

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** कर्तव्य बुद्धीने केलेले दान हे सामाजिक उन्नतीसाठी वरदान ठरते दानातून मोक्षाचा मार्ग खुला होतो असे प्रतिपादन दमानी वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉक्टर स्वाती शिरडकर यांनी केले. समारंभाचे अध्यक्षस्थानी कर्करोग संशोधन संस्थेचे अधिष्ठाता डॉक्टर अरविंद गायकवाड हे होते. सिडको एन ३ येथील गणेश मंदिरात आयोजित सद्गुरु अन्नसेवा मंडळाच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या, प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पाडळकर यांनी केले या कार्यक्रमाचे संचलन गिरीश महाजन यांनी केले.

प्रारंभी स्वागत गीत सौ स्मिता परांजपे यांनी सादर केले त्यानंतर पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले डॉक्टर स्वाती शिरडकर यांचा परिचय सौ अंजली महाजन यांनी करून दिला तर डॉक्टर अरविंद गायकवाड यांची ओळख गोपीनाथ खरात यांनी करून दिली. पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले याप्रसंगी डॉक्टर विल धारूरकर, गणेश महाजन दिलीप परांजपे यांच्या हस्ते सुद्धा दीप प्रज्वलन करण्यात आले.

आपल्या भाषणात डॉक्टर स्वाती शिरडकर यांनी ज्ञानेश्वरीतील ओवीबद्ध रचनांचे संदर्भ देऊन अभ्यासपूर्ण विवेचन केले त्यांनी गीतेमधील सात्विक राजस आणि तामस दानातील सूक्ष्म भेद स्पष्ट केला अत्यंत सूत्रबद्ध अशी मांडणी करून त्यांनी त्याग दान यातील फरक ही सांगितला त्या म्हणाल्या विशुद्ध भावनेने घडविलेले दान हे माणसाला मोक्षप्राप्तीकडे घेऊन जाते. दानाला नामस्मरणाची जोड दिली असता मानवी जीवनात श्रेष्ठ समाधान लाभू शकते.

कर्करोग संशोधन संस्थेचे संचालक डॉक्टर अरविंद गायकवाड यांनी कर्करोगाची लक्षणे सांगितली. तसेच त्यांनी कर्करोगाच्या सामाजिक प्रतिबंधासाठी सतत प्रबोधनाची आवश्यकता आहे असे सूत्र मांडले. आपल्या भाषणात डॉक्टर गायकवाड पुढे म्हणाले की आपण कर्करोगाकडे भय म्हणून नव्हे तर योग्य वेळी निदान झाल्यास कर्करोग पूर्णपणे दूर करू शकतो यावर विश्वास ठेवला पाहिजे. संभाजीनगर येथे कर्करोग संशोधन संस्था ही भारतातील एक अग्रगण्य संशोधन संस्था आहे येथे पदव्युत्तर पातळीवरचे शिक्षण दिले जाते टाटा कर्करोग संस्थेने या संस्थेबरोबर सामंजस्य करार केल्यामुळे ही संस्था भारतामध्ये आता नावारूपाला येत आहे. या संस्थेसाठी संशोधन आणि विकासाच्या दृष्टीने आखण्यात आखण्यात आलेल्या विविध प्रकल्पांची त्यांनी विस्तृत माहिती दिली ते आपल्या भाषणात पुढे असे म्हणाले की सामाजिक प्रतिबंध हा सर्वोत्तम उपाय आहे. लोकांनी तंबाखू सारख्या व्यसनापासून दूर राहिले पाहिजे कर्करोगावर विजय मिळविण्यासाठी लोकशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे या प्रकारच्या कार्यक्रमातून सामाजिक प्रबोधन घडते असे सांगून त्यांनी सद्गुरु अन्नसेवा मंडळाच्या कार्याचा गौरव केला आणि हे कार्य समाजहितासाठी वरदान ठरणारे आहे असे सांगितले. या प्रसंगी डॉ. हेमलता कुलकर्णी, चंद्रकांत गुजर, डॉक्टर अनुराधा कुलकर्णी व सौ गीता साळी यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात भूतपूर्व नगरसेवक श्री प्रमोद राठोड यांनी संस्थेच्या कार्याचा गौरव केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या त्यांनी संस्थेच्या दरवर्षी होणाऱ्या वर्धापन दिनाचे प्रायोजकत्व



स्वीकारले आणि संस्थेच्या उपक्रमाची तोंड भरून प्रशंसा केली.

कार्यक्रमाच्या शेवटी संजय देशपांडे यांनी आभार मानले तर स्मिता परांजपे यांच्या पसायदानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास सिडको परिसरातील ज्येष्ठ नागरिक व प्रतिष्ठित मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यामध्ये प्रामुख्याने विजय जोग श्रीराम कुलकर्णी पवार वॉकर्स क्लबचे अध्यक्ष शिवाजी रामरुले, डॉ. श्याम सुंदर कुडे, नमस्कार बापू नमस्कार जयकुमार भोयरेकर तसेच अनंत पवार हे उपस्थित होते.

# चिंता कुणाला, देवाला की भक्ताला?

**ज्योतिर्मय साहित्य**

खरं म्हणजे प्रत्येक प्रार्थनेत,मंत्रात अर्थ भरलेला आहे. आपण सामान्य माणसे तो अर्थ जाणून न घेता प्रार्थना म्हणत असतो.

देवाच्या प्रत्येक कृतीमागे काहींना काही अर्थ भरलेला आहे. ऋषिमुनींनी जी शास्त्रे लिहून ठेवली आहेत ती खरेतर अर्थ पूर्ण आहेत.

आताच्या नवयुगात, तंत्रयुगात आपण त्या मार्गांचा अर्थही जाणून घेण्याच्या फंदात पडत नाहीत, कारण आपले जीवन वेगळेच आहे. वर्षानुवर्षे तपस्या करुन ऋषी मुनी सिद्धि प्राप्त करुन घेत असत, आणि आता आपल्याला सर्व सुख त्वरित हवी असतात. कारण धीर धरणे हे आपल्यात नाही.

तात्पर्य काय तर तो काळच वेगळा होता, आता जर आपण तसे करत बसलो तरआपले जगणेच कठीण होईल, जगात दहा टक्केच अशी धीर धरून सेवा करणारी माणसे असतात,

अगदी आज जरी प्रत्येकाने ठरवले की, मी तासनतास सेवेचा मार्ग अवलंबून प्रार्थना करत बसेन तर आपल्याला ते जमण्यासारखे नाही.

रोज आपण वास्तूशास्त्र, ज्योतिष शास्त्र या नियमांचे पालन करु शकत नाही, देवदेवतांच्या कथा, त्यांची महात्म्ये वाचली तर हजारो वर्षांच्या कालावधीनंतर या गोष्टी घडतात. शेवटी आपण फक्त आपल्याकडे असलेल्या वेळेतच देवाची सेवा प्रार्थना करु शकतो.

धीर धरण्याची आपली क्षमता नाही, म्हणूनच आपण माणूस म्हणून जन्माला आलोय, आपल्याला जो वेळ आणि कार्य सोपवून दिले आहे ते करताकरता सतत ईश्वराचा धावा करीत सत्कर्म करुन, दुसऱ्यांच्या उपयोगी पडून आपले जीवन सार्थकी लावावे.

आताच्या युगात हेही नसे थोडके.

हे खूप विचार करुन अवतरले विचार आहेत. पटणार नाहीत पण खरे आहेत. कारण आपल्याच घरातील एखादी व्यक्ती तासन्तास अशी ध्यानधारणा करीत बसली,



स्वप्न गंधा सतीश आंबेतकर
मुंबई. विरार.

किंवा आपण स्वतः जरी दहाबारा तास अशी तपश्चर्या करीत बसलो तरी उदरनिर्वाहाचा प्रश्न येतोच,

आणि तो प्रश्न जरी सुटला तरीमाणसाला ऐशोआरामाची जी सवय झाली आहे त्यातून तो ही असा त्याग करु शकेल कां?

कारण खरी भक्ती म्हणजे त्यागाची परिसीमा आणि आता नव्वद टक्के लोकांत ती नाही.

आता माणसाला मोबाईल शिवाय एक दिवस काढता येत नाही, उपासतापास हे जमणार नाही,पायी चालत जाणे, जमणार नाही, जमिनीवर बसणे, झोपणे, जेवणे, जमणार नाही, टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप वगैरे तांत्रिक उपकरणांशिवाय राहणे जमणार नाही, रोज साधे, सहज पचेल असे चांगले भोजन जमणार नाही, साधे सुती अंगभर कपडे वापरणे जमणार नाही. रोज पहाटे उठून व्यायाम करणे, नैसर्गिक रितीने मिळणारा साधनांचा उपयोग करुन जगणे जमणार नाही, स्टेटस नावाची जी लाईफ स्टाईल आहे, त्यात जो मोठेपणा आहे, तो दाखविण्याचा जो आभास आहे तो, त्याशिवाय राहणे जमणार नाही, आपण मोठ्या हॉटेलमध्ये मस्त पार्टी साठी जात असताना एखाद्या गरीब उपाशी भिकारी माणसाला आपल्या बरोबर नेऊन आपल्या टेबलवर बसून जेवायला घालणे जमणार नाही.

आपल्या घरातील कामे आपण स्वतःच करणे जमणार नाही,असो बरेच काही आहे तर शेवटी आपण कुठे धडपणे काही करु शकत नाही, शेवटी पर्याय काय उरतो तर आपल्या जीवनशैलीतूनच वेळ काढून भगवंताचे नामस्मरण करीत जमेल तेवढी भक्ती, प्रार्थना करत रहावी, आणि मुख्य म्हणजे आपल्यातील एकमेकांवरील माणुसकी, आदराची भावना जप्त रहावी. मनमोकळ्या प्रेमळ भावनेने माणुसकी जपावी हेही नसे थोडके.

देव सर्वोच्च शास्त्र, प्रार्थना हे सर्व महान आहे मानवाने त्या शक्तींचा नित्य आदर करावा व सर्वांशी प्रेमाने, सलोख्याने वागावे, एवढीच देवाची इच्छा आहे, मग त्यांचीही काळजी मिटेल आणि आपलीही.

****

# अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचा ‘पुरुषोत्तम’ जल्लोष

## पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेची तब्बल सहा पारितोषिके

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाने (हडपसर) सादर केलेल्या ‘काही प्रॉब्लेम ये का?’ एकांकिकेने बाजी मारत महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित आंतर महाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत हीरक महोत्सवी पुरुषोत्तम करंडक पटकावला. संघाला ५००१ रुपयांचे रोख पारितोषिका बरोबरच सांघिक प्रथम (काही प्राब्लॅम ये का?, अण्णासाहेब मगर कॉलेज, हडपसर), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आस्था काळे (काही प्राब्लॅम ये का?, अण्णासाहेब मगर कॉलेज, हडपसर) अभिनय नैपुण्य (अभिनेता) ओमकार कापसे (प्रतिक, काही प्रॉब्लेम ये का?, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर) अभिनय उत्तेजनार्थ (अंतिम फेरी) : विद्यार्थी, भूमिका, एकांकिका महाविद्यालय या क्रमाने आस्था काळे (दृष्टी, काही प्रॉब्लेम ये का?, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर), समिक्षा काळे (बहिण, काही प्रॉब्लेम ये का?, अण्णासाहेब मगर महाविद्यालय,




हडपसर अशी एकूण सहा पारितोषिके मिळवत जल्लोष केला.

या भरघोस यशाबद्दल महाविद्यालयाने ‘काही प्रॉब्लेम ये का?’ या एकांकिकेच्या कलाकार विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य व व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी गळ्यात हार घालून व पेढे भरवून जंगी स्वागत केले. कलाकारांबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डीजीचे ठेक्यात, फटाके फोडत आनंदोत्सव साजरा केला.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे यांनी विद्यार्थांचा पुष्पगुच्छ देऊन कलाकार विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले. तसेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव मा. ॲड. संदीप कदम, खजिनदार मा. ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव मा. एल. एम. पवार, सहसचिव मा. ए. एम. जाधव, डॉ. शंतनू जगदाळे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शुभांगी औटी, डॉ. प्रशांत मुळे, प्रा. अनिल जगताप, प्रा. सुधीर रोकडे यांनी ‘काही प्रॉब्लेम ये का?’ टीमचे अभिनंदन केले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे होणार साजरा !


**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** दि. १७ सप्टेंबर रोजी मा. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे भव्य १६ फुटी भारत नकाशावर रांगोळी ने श्री डी केलेली मोदींची प्रतिमा आकर्षण ठरणार आहे. ७५ वा वाढदिवस असल्याने त्यांच्या दीर्घायुषीसाठी महिला व मुली देवी समोर आरती व औक्षण करणार आहेत.

जवळपास २०० महिलां व मुली यांना प्रतिष्ठान तर्फे चार दिवसापासून मोफत दांडिया प्रशिक्षण देण्यात आले आहे. या सर्वांकडून पुष्पवृष्टी पण करण्यात येणार आहे. या वेळी नवरात्र जवळ येत असल्याने सर्व महिला व मुली या दांडियाच्या ड्रेसमधे असतील ते ड्रेस १ दिवस कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सर्वांना वाढदिवस निमित्त मिठाई पण देण्यात येणार आहे.

हा सर्व उपक्रम कुलस्वामिनी मंगल कार्यालय येथे सायंकाळी ५ ते ६ दरम्यान होणार असून जास्तीतजास्त नागरिकांनी उपस्थिती द्यावी अशी विनंती विलास कोरडे व सौ अलका कोरडे यांनी केली आहे. प्रोजेक्ट डायरेक्टर अविराज कोरडे हे असून उपक्रम यशस्वी करणेसाठी चंद्रमुनी जायभाय, प्रल्हाद गायकवाड, अनिल गावंडे, राहुल नावकर हे सहकार्य करणार आहेत.







# सर्वांची आवडती - पाव भाजी...

**ज्योतिर्मय साहित्य**

अलीकडे ऋतू कधी आपले रूप बदलेल हे सांगता येत नाही. गणोबा घरी गेला आणि पाऊसधारा कोसळू लागल्या. हवेत गारवा भरला. अशा हवेत छान गरमागरम खावे न वाटले तरच नवल वाटेल..

आम्हां बहिणींचा एक रेसिपी समूह आहे.त्यावर तिने स्ट्रीट पाव भाजीची लिंक टाकली. तशी तर पावभाजी आम्हां सगळ्यांचा खूप आवडते त्यामुळे नेहमी केली जाते.या वेळी या वेगळ्या पद्धतीने करूया असे ठरविले.. या पावभाजी मधील वेगळेपण म्हणजे खास रंगासाठी छोटे बीट आणि थोड्या काश्मिरी मिरच्या घातल्या होत्या.






लेकाने पटापट मी सांगितलेले सगळे सामान आणून दिले.. आणि मग मी सढळ हाताने बटर आणि लोणी वापरून झकास पावभाजी केली..

अहाहा त्याचा सुंदर रंग, वरून चिरलेला बारीक कांदा, कोथिंबीर आणि त्यावर शुभ्र लोणी बघूनच रसना चाळवली. ही पावभाजी घरी सगळ्यांनाच खूप आवडली.भरपूर कौतुक आणि तृप्तता मला मिळाली.

पावभाजी म्हणजे काही वेगळ्या चवी, रंग घेऊन आलेल्या भाज्यांचे योग्य एकत्रीकरण. त्यामध्ये थोडी मिरची, आले, लसूण कांदा असे थोडे उग्र पदार्थही असतात आणि लोणी, बटर सारखे स्निग्ध सहज विरघळणारे पदार्थही असतात.. हिरवीगार कोथिंबीर आणि लिंबूची फोड याची चव वाढविते. जोडीला पाव असतो, जरी बटर लावून भाजला तरी मैदा पचनाला जड पण इथे तो सहज खपून जातो.. असेच असते ना आपले जीवन? कुटुंब असो वा समाज,एकत्र येणे तर होणारच. अशावेळी आपल्याला भाजीसारखे मिसळून घ्यायला जमायला हवे. आणि स्निग्ध लोण्यासारखे विरघळता यायला हवे. असे झाले तर भन्नाट पावभाजीसारखे आयुष्यही रंगीत आणि चवदार होईल. हो ना?

# दशावतार एक विलक्षण सुंदर चित्रपट

**ज्योतिर्मय साहित्य**

काही कलाकार लोक विलक्षण प्रतिभावंत असतात. त्याचं जे काही काम असतं ते अतिशय मन लावून, त्यात जीव ओतून, तल्लिनतेने करत असतात. आणि त्यातून एक सुंदर कलाकृती जन्म घेत असते, सर्वांना आनंद देण्यासाठी.

आपल्या मराठी सिनेमा इंडस्ट्रीमध्ये दिलीप प्रभावळकर हे असंच विलक्षण प्रतिभेचे मोठं नाव आहे. ते जे काही काम करतात, ते अगदी त्यात जीव ओतून करतात, आणि मग निर्माण होणारी कलाकृती काही औरच असते. नुकताच सुबोध खानोलकर लिखित व दिग्दर्शीत मराठी चित्रपट आला आहे त्याच नाव आहे, दशावतार. कोकणाला लाभलेला सुंदर निसर्ग, त्यावर होणारे अतिक्रमण आणि बाबुली मिस्त्रीच्या आयुष्यावर आधारित हा चित्रपट आहे दशावतार. या चित्रपटाचे कथानक, भव्यता, दिव्यता, विविध रंजक वळणं, अभिनेते आणि सर्व कलाकरांची रंगभूषा, वेशभूषा आणि अभिनय हे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. रंगभूषाकार रोहित महाडिक व वेशभूषाकार सचिन लोवलेकर यांनी आपल्या आपल्या कामात दाखवलेले कौशल्य हे ही खूप वाखाणण्या जोगे आहे.

या चित्रपटात सर्वांना आश्चर्यचकित करणारे असं सुंदर काम, दिलीप प्रभावळकर या ८१ वर्षांच्या तरुणाने केले आहे. ते इतक सुंदर आहे की मी कवी या नात्याने म्हणायचे झाल्यास, मी दिलीप प्रभावळकर काकांना म्हणेल,

कोण म्हणे मज म्हातारा?
मी तर तरुण नवा कोरा
अभिनयाच्या क्षेत्रामध्ये
अजूनही मी चमकता तारा

इतका जबरदस्त अभिनय त्यांनी या चित्रपटात केला आहे. दिलीप काकांनी मत्स्य, यम, वराह, नरसिंह, राम, हनुमान, ध्रुतराष्ट्र हे अवतार तर प्रेक्षकांसमोर जिवंत केले आहेत. या अवतारांनी खूप धमाल उडवून दिली आहे.

प्रत्येकाने वेळ काढून हा चित्रपट अवश्य पहावा, असा सुंदर अभिनय दिलीप प्रभावळकर यांनी केला आहे. वय हा फक्त एक आकडा असतो हे त्यांनी सर्वांना दाखवून दिले आहे.

प्रेक्षकांना काही तरी नवीन देण्यासाठी करावयाचे प्रयत्न कष्ट, मनाची तयारी, कामाची तयारी आणि त्यात जीव ओतायची सवय हे दिलीप काकाकडून शिकावी, असेच म्हणावे लागेल. फक्त आपल्या अभिनयाच्या ताकदीवर ते दशावतार या चित्रपटासाठी प्रेक्षकांना सिनेमागृहात खेचून आणत आहेत.

मोठ्या मोठ्या चित्रपटांनाही मागे टाकेल, अशी या चित्रपटाने अवघ्या दोन दिवसात तब्बल २ कोटींच्या वर कमाई बॉक्स ऑफिसवर केली आहे, असे वाचण्यात आले आहे. खरं तर मराठी चित्रपट हे फक्त मराठी प्रेक्षका पुरते मर्यादित असतात म्हणून या चित्रपटाला दोन दिवसात झालेली कमाई ही ही खरंच कमाल जादू आहे. सध्या रोज या चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद मिळत असून चित्रपटाला प्रचंड गर्दी होते आहे. अभिनेते दिलीप प्रभावळकर यांची या चित्रपटात मुख्य भूमिका असून या




भूमिकेसाठी त्यांनी काही स्टंट देखील केलेले आहेत. खरं तर ८१ व्या वर्षी असे करणे? हे काही खायचे काम नाही. पण आपल्या दिलीप काकांनी ते साध्य केले आहे. आणि ते ही काकांच्या अंगात ताप असतानाही ही ॲक्शन सीन दिली आहेत. दिलीप काका, तुमच्या उत्साहाला चॅलेंज नाही. दिलीप काकांना प्रणाम.

या चित्रपटात दिलीप प्रभावळकर यांच्या सोबतीला सुनील तावडे, महेश मांजरेकर, सिद्धार्थ मेनन, अभिनय बेर्डे, प्रियदर्शनी इंदलकर, भरत जाधव, रवी काळे, विजय केंकरे, आरती वडगबाळकर, या सर्वांनीच आपल्या भूमिका तेवढ्याच ताकदीने वठविल्या आहेत, त्याही अगदी सहजसुंदर अभिनयाने आणि सर्वांनीच दशावतार या मराठी चित्रपटाला न्याय दिला आहे. गुरू ठाकूर यांनी लिहिलेली गीते या चित्रपटाला लाभली आहेत. चित्रपटाची कथा येथे मुळीच सांगणार नाही, कारण दशावतार हा चित्रपट प्रत्यक्ष जाऊन मोठ्या पडद्यावर पाहण्याची मजा काही औरच आहे.यातील गुपित आणि थ्रील प्रत्यक्ष चित्रपट पाहून अनुभवल्याशिवाय कळणार नाही.

मी एकदा हा चित्रपट बघितला आहे, आणि पुन्हा एकदा बघणार आहे. आ.श्री दिलीप प्रभावळकर काकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या ८१ व्या तारुण्याचे रहस्य नक्कीच उलगडून घ्यायचे आहे, त्यांना जेंव्हा वेळ मिळेल तेव्हा. माझ्या तर्फे दशावतार चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक सर्व कलाकार




आणि सर्व संबंधित यांना खूप शुभेच्छा आणि दशावतार हा मराठी चित्रपट १०० कोटींचा पल्ला लवकरच करो ही सदिच्छा!

# राष्ट्रीय माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली –** राष्ट्रीय माध्यमिक शिष्यवृत्ती योजना अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. अर्ज सादरीकरणाची प्रक्रिया राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल वर २ जून २०२५ पासून सुरू आहे. यावर्षी विद्यार्थ्यांना प्रथम एक-वेळ नोंदणी करणे आवश्यक असून त्यानंतर निवडलेल्या शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करावा लागणार आहे. नोंदणीसंदर्भातील वारंवार विचारले जाणारे प्रश्न उपलब्ध आहेत. शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन आठवी नंतर शिक्षण सोडण्याचे प्रमाण कमी करणे आणि त्यांना बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यास प्रोत्साहित करणे हा आहे.

प्रत्येक वर्षी राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतर्फे घेण्यात येणाऱ्या पात्रता परीक्षेत यशस्वी झालेल्या नववीतील एक लाख विद्यार्थ्यांना प्रत्येकी १२,००० रुपये वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते. शिष्यवृत्ती दहावी ते बारावीपर्यंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारे नूतनीकरण पद्धतीने सुरू राहते. ही योजना केवळ स्थानिक स्वराज्य संस्था किंवा शासकीय अनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.

३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत एकूण ८५,४२० नवे व १,७२,०२७ नूतनीकरण अर्ज अंतिम स्वरूपात सादर झाले आहेत. शिष्यवृत्तीची रक्कम थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते.

शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अटींमध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न ३.५० लाख रुपयांपेक्षा अधिक नसणे आवश्यक आहे. तसेच सातवीत किमान ५५ टक्के गुण मिळणे गरजेचे आहे.

अर्जांच्या पडताळणीसाठी दोन स्तर आहेत पहिला स्तर (१) संस्थेच्या नोडल अधिकाऱ्याकडे असून त्यासाठी अंतिम तारीख १५ ऑक्टोबर २०२५ आहे. दुसरा स्तर (२) जिल्हा नोडल अधिकाऱ्याकडे असून त्याची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे.

# मराठी भाषेच्या प्रचारासाठी ‘निबंध लेखन’ व ‘मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा’ स्पर्धेचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली –** मराठी भाषेचा प्रसार आणि विकास व्हावा यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध लेखन आणि मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ५ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ०१ ऑक्टोंबर २०२५ आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येकी २५ रुपये शुल्क आकारले जाईल, आणि दोन्ही परीक्षा प्रत्येकी दोन तासांच्या असतील.

स्पर्धेत विविध वयोगटांसाठी तीन गट आणि वैविध्यपूर्ण विषय ठेवण्यात आले आहेत. गट क्र. १ (१२ ते १६ वर्षे, १५०-५०० शब्द) मध्ये ‘स्वातंत्र्यवीर सावरकर एक अलौकिक व्यक्तिमत्त्व, ‘खेळामुळे मिळणारे जीवनाचे धडे, ‘माझी आई सर्वकाही हे विषय आहेत. गट क्र. २ (१७ ते ३० वर्षे, ५००-१००० शब्द) मध्ये ‘यशासाठी आहार आणि विहार, ‘फेक बातम्या व सूचनांचा अतिभार एक गंभीर विषय’, ‘मराठी भाषेचा वापर हीच मराठी भाषेची जपणूक आहे’ हे विषय देण्यात आले आहेत. गट क्र. ३ (१०००-१५०० शब्द) मध्ये ‘पुण्यश्लोक देवी आहिल्यादेवी होळकर यांची राष्ट्रभक्ती, ‘कुंभमेळा: एक महान परंपरा की भ्रमंती ‘धर्म आणि विज्ञान मित्र की शत्रू हे विषय आहेत.

मराठी भाषा, संस्कृती आणि साहित्याच्या माध्यमातून तरुण पिढीला प्रेरणा देण्याचे उद्दिष्ट या स्पर्धेद्वारे साध्य केले जाणार आहे. मराठी परीक्षेच्या पाच स्तरांमध्ये परिचय, प्राज्ञ, मध्यमा, कोविद प्रथम आणि कोविद द्वितीय यांचा समावेश आहे.

अधिक माहितीसाठी किंवा अर्ज भरण्यासाठी संपर्क साधावा: परीक्षा कार्यालय, ५६-बी, वैशाली नगर, इंदूर ४५२००९. फोन: ८३२९४२३८६४,७३८९२९३९९७. इच्छुकांनी त्वरित अर्ज सादर करावेत, असे आवाहन संस्थेने केले आहे. दिल्ली व दिल्लीच्या आसपास परिसरासाठी केंद्र प्रमुख श्रीमती शशी कुलकर्णी (मो.क्र ९८६८०२३०६४) यांच्याशी संपर्क साधावा.

# पीएम- ई-विद्या वाहिन्यांद्वारे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी नवे ज्ञानविश्व

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई –** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र यांच्या पुढाकाराने आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने पीएम-ई-विद्या शैक्षणिक वाहिन्यांचे महाराष्ट्रात प्रक्षेपण सुरू झाले आहे. भारत सरकारच्या ‘वन क्लास वन टीव्ही चॅनेल’ या अभिनव संकल्पनेनुसार देशभरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी तब्बल २०० शैक्षणिक टीव्ही वाहिन्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या सर्व उपक्रमात महाराष्ट्र राज्यासाठी पाच समर्पित पीएम-ई-विद्या वाहिन्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

पीएम-ई-विद्या ११३ इयत्ता १ वी व ६ वी, पीएम-ई-विद्या ११४ इयत्ता २ री व ७ वी, पीएम-ई-विद्या ११५ इयत्ता ३ री व ८ वी, पीएम-ई-विद्या ११६ इयत्ता ४ थी व ९ वी आणि पीएम-ई-विद्या ११७ इयत्ता ५ वी व १० वी या वाहिन्यांवर त्यासमोर दिलेल्या इयत्तांसाठी दर्जेदार शैक्षणिक आशयाचे प्रक्षेपण केले जात आहे. या सर्व वाहिन्या डीडी-फ्री डिश व्यतिरिक्त यूट्यूब वर थेट (लाईव्ह) उपलब्ध असून प्रत्येक वाहिनीवर दररोज सहा तासांचे शैक्षणिक प्रक्षेपण केले जाते. हे कार्यक्रम २४ तासांत तीन वेळा पुनर्प्रक्षेपित होतात, त्यामुळे विद्यार्थ्यांना व पालकांना सोयीच्या वेळेस पाहणे शक्य होते.

या उपक्रमासाठी राज्यस्तरावर तसेच वाहिनीनिहाय शैक्षणिक आणि तांत्रिक समन्वय रचना उभारण्यात आली आहे. समन्वयक मंडळ प्रक्षेपणाची गुणवत्ता सुनिश्चित करणे, वेळापत्रक अद्ययावत ठेवणे आणि कार्यक्रमांची शाळा व पालकांपर्यंत प्रभावी पोहोच घडवून आणणे या जबाबदाऱ्या पार पाडत आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्रामार्फत सर्व शिक्षक, अधिकारी तसेच पालकांना आवाहन करण्यात येत आहे की, या सर्व शैक्षणिक वाहिन्या यूट्यूब वर सब्स्क्राइब कराव्यात. यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ मिळेल. या प्रक्षेपणाचे मासिक वेळापत्रक आणि वाहिन्यांचे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी यूट्यूब लिंक परिषदेच्या संकेतस्थळावर पीएम-ई-विद्या वाहिन्या या टॅब अंतर्गत उपलब्ध उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पीएम-ई-विद्या वाहिन्यांचा उपयोग करण्यासाठी http://www.maa.ac.in/index.php?tcf=pmev या लिंकचा देखील उपयोग करता येईल.

पीएम-ई-विद्या या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचे सामर्थ्य अनुभवायला मिळत आहे. हे पाऊल ग्रामीण व शहरी भागातील शैक्षणिक दरी कमी करून प्रत्येक मुलापर्यंत ज्ञान पोहोचवत आहे. या वाहिन्यांद्वारे अभ्यासक्रमाशी थेट निगडित तसेच मुख्य प्रवाहातील सर्व शालेय विषयांसाठी दर्जेदार व्हिडिओ सामग्री उपलब्ध होत असून, विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला गती मिळत आहे. शिक्षकांसाठीही हे एक प्रभावी शैक्षणिक साधन ठरत असून, शिक्षणाचा दर्जा आणखी उंचावण्यास मदत होत आहे.

पीएम-ई-विद्या हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या ज्ञानसंपन्न भविष्यासाठी महाराष्ट्र सरकारचा एक क्रांतिकारी प्रयत्न असून, परिषदेमार्फत सर्वांना या वाहिन्या सब्स्क्राइब करण्याचे आवाहन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांनी केले आहे.

# शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात लक्ष्मीकांत देशमुख यांचे मत; देशाच्या विकासासाठी शिक्षणाला प्राधान्य द्यावे लागेल

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** सगळ्यांना केजी टू पीजी मोफत, गुणवत्तापूर्ण आणि समान शिक्षण देण्याचा नारा ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांनी दिला होता. मात्र, दुर्देवाने आजही शिक्षणाकडे तितक्या गंभीरपणे पाहिले जात नाही. सर्वच क्षेत्रात देशाचा पाया पक्का करण्यासाठी शिक्षणाला अग्रक्रम देणे आवश्यक आहे, असे मत ज्येष्ठ लेखक आणि माजी संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

भाई वैद्य फाउंडेशन आणि आरोग्य सेनेतर्फे लोकनेते भाई वैद्य गुणवंत व गरजू विद्यार्थी शिष्यवृत्ती प्रदान सोहळा लक्ष्मीकांत देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि भाई वैद्य फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. अभिजित वैद्य, भाई वैद्य फौंडेशनच्या सचिव प्रा. डॉ. गीतांजली वैद्य, आरोग्य सेनेचे केंद्रीय समिती सदस्य डॉ. नितीन केतकर, ज्येष्ठ सदस्य वर्षा गुप्ते, राष्ट्रीय सरचिटणीस लक्ष्मीकांत मुंदडा, राज्य शाखा प्रमुख अतुल रूणवाल आणि पुणे शहर व जिल्हा प्रमुख हणुमंत बहिरट उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांसह देणगीदारांच्या हस्ते २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पुणे शहर आणि परिसरातील २० शाळांमधील एकूण १०७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये १२ हजार रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले की,



आजही आर्थिक अडचणींमुळे अनेक हुशार विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. विशेषतः आठवी ते दहावीच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण खूप जास्त असते. तसेच आर्थिक अडचण निर्माण झाल्यानंतर पहिली गदा मुलींच्या शिक्षणावर येते. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यासाठी समाजाने पुढाकार घेतला पाहिजे. आज शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षार्थी न होता ज्ञानार्थी होणे आवश्यक आहे. त्यासाठी रोज आवांतर पुस्तकांचे वाचन करणे, शाळेतील प्रत्येक तासाला उपस्थित राहणे आणि जास्तीत जास्त सराव करणे आवश्यक आहे. डॉ. अभिजित वैद्य म्हणाले की, आज जगामध्ये शिक्षण क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे होत असून विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे सगळे जग एका वेगळ्या बदलाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. असे असताना आपल्याकडे मात्र, सरकारी शाळांचे अनुदान हळुहळू कमी करून त्या शाळा बंद कशा होतील, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. गेल्या काही वर्षात देशातील ८९ हजार शाळा बंद झाल्याची आकडेवारी उपलब्ध आहे. तर दुसरीकडे विद्यार्थ्यांना गुणांचे कारखाने बनवणाऱ्या व्यवस्थेने एकदा आपले शैक्षणिक धोरण तपासून पाहण्याची गरज आहे. सगळीकडे पसरलेले खासगी शिकवण्यांचे जाळे म्हणजे शिक्षण व्यवस्थेचे अपयश आहे. ज्ञानाची कास धरणे आणि विज्ञानाची आस बाळगणे महत्वाचे असून विज्ञानामध्ये विवेक, मानवता आणि विधायकता पेरणे आवश्यक आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559